भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.६२०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०९/२०१७

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन लोखंडी चाकुने जखमी करुन जिवाने ठार मारण्याच्या प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/०९/२०१७ चे १९.३० वा. दर. दिनांक ३०/०८/२०१७ रोजी यातील आरोपी क्र. ५ व ६ यांचे फिर्यादीचा मित्र ज्ञानेश्वर कापगते यांचे सोबत झालेल्या भांडणाच्या कारणावरुन आरोपी क्र. १ याने फिर्यादीस फोन करुन तुला भेटायचे आहे असे सांगुन फिर्यादीने काशीराम यांचे हॉटेल मध्ये भेटण्यास बोलावले असता आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन आरोपी प्रवीण शहारे याने बिना परवाना कलम ३७(१)(३) मपोका आदेशांचे उल्लघन करुन हातात लोखंडी चाकु घेवुन फिर्यादीजवळ जावुन त्याचा हात धरुन बाजुला नेवुन फिर्यादीचे डोक्यावर मोठया चाकुच्या मुठीने मारुन जखमी करुन जिवाने ठार मारण्याच्या उद्दशाने मोठा चाकु ३ ते ४ वेळा फिरवुन जिवाने ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी पंकज हेमराज मुंगुलमारे वय २१ वर्ष, रा. चिचगड जिल्हा गोंदिया ह. मु. सेंदुरवाफा यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पो.स्टे. साकोली येथे कलम १४३,१४७,१४८,१४९,३०७ भांदवि. सहकलम ४,२५,भा.ह का. सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. वर्मा पो.स्टे साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०३/०९/२०१७ चे १३.०० वा. दर. पर्यंत यातील अल्पवयीन पिडीत फिर्यादी ही एकटीच असतांना आरोपीने फिर्यादीचे घरात प्रवेश करुन तिच्यावर जबरीने अत्याचार केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. लाखांदुर येथे कलम ३७६,५११,३५४(अ)(१)४५१ भादवी. सहकलम ८,१० लै.अ.बा.सं.अधि २०१२ सहकलम ३(१)(डबलु)(आय) अ.जा.ज.अ.प्र.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. टिक्कस हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) संगनमत करुन पैश्याची बॅग हिसकावुन नेल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०३/०९/२०१७ चे १३.४५ वा. दर. पर्यंत यातील फिर्यादी दिनेश देवराम हरड वय ३० वर्ष, रा. वळद पुर्नवसन यांचे हार्डवेअर दुकानात त्याचा भाचा श्रीकांत रामकृष्ण तिडके वय १५ वर्ष, हा बसला असतांना दोन अनोळखी इसमांनी स्टाईल्स कापण्याचा ब्लेड घेवुन २,०००/–रु. ची नोट दिल्याने, त्यांना चिल्लर देण्याकरीता नोटाची बॅक काढली असता यातील दोन अनोळखी आरोपी इसमांनी पैश्याची बॅग ५१,०००/–रु. ठेवली असलेली बॅग फिर्यादीचा भाचा यांचे हातातुन हिसकावुन नेवुन मोटार सायकलने पडुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. अडयाळ येथे कलम ३९२,३४ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. डोंगरे पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत.

**४) घरातील सोन्याचे दागीण्याची व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक ०२/०९/२०१७ चे १२.०० ते ०३/०९/२०१७ चे ०७.०० वा. दर. यातील फिर्यादी नरेंद्र दिवाकर भुजाडे वय ४५ वर्ष, रा. तकीया वार्ड भंडारा हा आपले बहीनीचे घरी गणपतीचे जेवन करण्या करीता परीवारासह घराचे समोरील दाराला लॉक लावुन गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे घराचे समोरील दाराचा लॉक तोडुन आत प्रवेश करुन घरातील कपाटामध्ये ठेवलेले कानातील सोन्याचे टॉप्स वजन ०४ ग्रॅम, सोन्याची अंगठी वजन ०४ ग्रॅम, सोन्याची नथ वजन ०३ ग्रॅम, सोन्याची गरसोली वजन ०५ ग्रॅम, सोन्याचे कानातील रिंग वजन ०२ ग्रॅम, सोन्याचे टॉप्स ०२ ग्रॅम, सोन्याचा लॉकेट वजन ०१ ग्रॅम व नगदी २५,०००/–रु. असा एकुण ६७,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**५) नजर चुकवुन हातचालाकीने एटीएम मधुन पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०३/०९/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील फिर्यादी भिकालाल बरखी रिनायत वय ६१ वर्ष, रा. दावेझरी आंबागड हा श्रीराम भवन जवळील एसबीआय एटीएम मधुन पैसे काढण्यासाठी गेला असता १ अनोळखी ईसमाने त्याचा अनोळखीचा फायदा घेवुन लबाडीने हातचालाकी करुन फिर्यादीची नजर चुकवुन त्याचे खात्यामधुन १०,०००/—रु. काढुन फसवणुक केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४२० भादवी. सहकलम ६६(ड)आय टी ॲक्ट. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. कंकाळे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**६) अवैध दारु/ जुगार अडयावर धाडी . :—**

दिनांक ०३/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, करडी, तुमसर, पवनी, अडयाळ, कारधा व लाखांदुर येथे दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २५ लिटर हातभटटी दारु + ७७० किलो सडवा मोहा + साहीत्य किंमती ४१,७५०/—रु. व ४ लिटर ८६० मिली लिटर देशी दारु किंमती १४०४/—रु. तसेच जुगारातुन किंमती ५९४०/—रु. चा माल असा एकुण ४९,०९४/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करिता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.